# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : □□□□□□□□□@□□□□□.□□□

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि ०८/०४/२०२५

### जिल्हा :पुणे

**मागील आठवडयाचे हवामान :**

मागील आठवडयाचे हवामान : पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३५.१ ते ४०.२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १७.४ ते २३.२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ५९ ते ९४ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ११ ते ३७ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी २.४ ते ४.० कि.मी. होता.

हवामान अंदाज : पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ३८ ते ४० अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १९ ते २१ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ५० ते ५५ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता १२ ते १३ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०१ ते १० कि.मी. दरम्यान राहील. आकाश अंशतः ढगाळ राहील. वा-याची दिशा आग्नेयेकडून वायव्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (०२/०४/२०२५ ते ०८/०४/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०८/०४/२०२५ ते १२/०४/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | दिनांक | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 0.0 | 0.0 | 7.5 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 35.3 | 35.1 | 36.0 | 36.2 | 38.0 | 39.2 | 40.2 | कमाल तापमान(अं.से.) | 40 | 40 | 39 | 38 | 38 |
| 23.2 | 21.0 | 18.5 | 17.4 | 17.7 | 18.5 | 21.2 | किमान तापमान(अं.से.) | 21 | 21 | 20 | 20 | 19 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 3 | 2 | 2 | 3 | 3 |
| 59 | 72 | 94 | 86 | 77 | 65 | 71 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 53 | 52 | 50 | 50 | 55 |
| 37 | 31 | 29 | | 11 | 13 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 12 | 13 | 12 | 12 | 12 |
| 3.3 | 4.0 | 2.6 | 2.4 | 3.0 | 3.0 | 2.7 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 1 | 6 | 8 | 10 | 9 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 0 | 266 | 262 | 287 | 297 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०८ ते १२ एप्रिल, २०२५ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १३ ते १९ एप्रिल, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • नवीन लागवड केलेल्या फळबागेमध्ये जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा. |

| | | |
|---|---|---|
| | | • शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास, विविध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी , हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| ऊस | पिक वाढीची अवस्था | ऊस पिकातील खोडकिडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) चार प्रती एकर तसेच कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) ५ प्रती हेक्टरी वापरावेत. प्रादुर्भावग्रस्त झालेली रोपे जमिनीलगत कापावीत आणि नष्ट करावीत. |
| कांदा | पक्वता ते काढणी अवस्था | काढणी केलेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. कांदा काढताना पातीसह काढून तो ३ ते ४ दिवस शेतामध्ये सुकू द्यावा. काढलेला कांदा ओळीमध्ये रचावा व अर्धवटरित्या पातीने झाकावा. पात वळल्यानंतर ४ से.मी. लांब मान ठेऊन पात कापावी. |
| उन्हाळी भुईमूग | शेंगा लागण अवस्था | भुईमूगाच्या शेंगा लागण्याच्या वेळी तसेच शेंगा पोसण्याच्या कालावधीत पाण्याचा ताण पडू देवू नये. पिकास जमिनीच्या मगदुरानुसार व पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार पाण्याचे नियोजन करावे. |
| उन्हाळी बाजरी | पिक वाढीची अवस्था | उन्हाळी बाजरी पिकास जमिनीच्या मगदुरानुसार व पिकाच्या वाढीच्या संवेदनक्षम अवस्थे नुसार पाण्याचे नियोजन करावे. |
| मका | काढणी ते साठवणूक अवस्था | अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. पीक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी करावी. तसेच उन्हात चांगले वाळवावेत. साठवण कोंदट किवा ओलसर जागेत करू नये. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाट्ट्यांच्या सह्यायाने झाडांना/ घडाना आधार/ टेकू द्यावा. |
| आंबा | फळधारण अवस्था | आंबा मोहरामधील पर्णगुच्छ दिसून आल्यास तो मोहोर कापून नष्ट करावे व तोडलेल्या जागी कॉपरऑक्झीक्लोराईड द्रावण ३ ग्रॅम प्रति लिटर पाण्यासोबत लावावे. तसेच आंबा पिकाच्या नवीन पालवीवरील पर्णगुच्छ दिसून आल्यास ती पालवी कापून नष्ट करावी व तोडलेल्या जागी कॉपरऑक्झीक्लोराईड द्रावण ३ ग्रॅम प्रति लिटर पाण्यासोबत लावावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्रशिक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्यावतीने विकसित करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या फुले अमृतकाळ ( □□□□□ □□□□□□□□ □□□) या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (ॲप) लोकार्पण झाले असून , आता आपण ते मोबाईल मध्ये इंस्टाल करून मोबाईलवर पशुसल्ला घेऊ शकतो.<br>फुले अमृतकाळ ॲप डाउनलोड ( □□□□□ □□□□□□□□ □□□ □□□□□□□□) केल्याने होणारे फायदे : फुले अमृतकाळ या ॲपच्याद्वारे जनावरांना उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी, गोठ्यातील तापमान घटविण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे , योग्य वायु विजन राखणे, पिण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे , फॅन किंवा फॉगर यंत्रणा स्वयंच लीत पद्धतीने सुरू करणे तसेच संतुलित आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील. |
| *टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावीतसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा. | | |

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म.वि., पुणे.

दि. : ०८.०४.२०२५

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा

प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे